Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई
बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.मं./परीक्षा–६/ ४९२७
पुणे–४११ ००४.
दिनांक–१९/११/२०२६

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–४०००३२.
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई–४०००३०.
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई–२०
५) मा. संचालक,आकाशवाणी केंद्र पुणे/नागपूर/ छ.संभाजीनगर /मुंबई/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक/ रत्नागिरी
६) मा. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्रे

विषय – फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत

महोदय,

फेब्रु–मार्च २०२७ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांच्या सुधारित वेळापत्रकाबाबतचे शुध्दीपत्रक सोबत जोडले आहे. सदर शुध्दीपत्रकास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी–

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी यांनी स्थानिक स्तरावर शुध्दीपत्रक प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.

माहितीस्तव सविनय सादर–

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई–३२.
मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्तालय, पुणे–०१.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय– फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत

शुध्दीपत्रक

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांची दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रके मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि.०६/११/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. त्यातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील अर्थशास्त्र या विषयाच्या वेळापत्रकामध्ये (सत्रामध्ये) अंशत: बदल करण्यात येत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा							
अ. क्र.	विषयाचे नाव	पूर्वीचा तपशील			सुधारित तपशील		
		दिनांक	सत्र	वेळ	दिनांक	सत्र	वेळ
१.	अर्थशास्त्र (क/वि/वा) Economics (A/S/C)	१७ फेब्रुवारी, २०२७	**सकाळ सत्र**	सकाळी ११:०० ते २:००	१७ फेब्रुवारी, २०२७	**द्वितीय सत्र**	दुपारी ३:०० ते ६:००

उपरोक्त बदलाव्यतिरिक्त उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक हे अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्तबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १९/११/२०२६

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

Scanned with OKEN Scanner